# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 08 January 2025

## Time 18.10 to 18.20

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक – ०८ जानेवारी २०२५ सायंकाळी ६.१०

****

- अंमली पदार्थ विरोधातल्या लढाईत सहभागी होण्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं आवाहन
- मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यासंदर्भातला शासन आदेश केंद्राकडून जारी
- देशभरात वाहन चालक प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यासंदर्भात केंद्र सरकारची विशेष योजना
- गुजरातमध्ये कार आणि ट्रकच्या अपघातात पालघरच्या तीन तरुणांचा मृत्यू

आणि

- मलेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारतीय खेळाडूंची आगेकूच

****

अंमली पदार्थाच्या विरोधात लढणं हीच आजच्या काळातली देशभक्ती असून, या लढाईत सहभागी होण्याचं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. नवी मुंबई पोलिसांच्या वतीने नशा मुक्त नवी मुंबई अभियानाला आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत प्रारंभ करण्यात करण्यात आला, त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. अंमली पदार्थांचे व्यवहार आज सामाजिक संपर्क माध्यमांवरूनही होत असल्याचं दिसून येत आहे, अशा व्यवहारांची माहिती मिळाल्यास, ८८ २८ ११२ ११२ या टोलफ्री क्रमांकावर माहिती देण्याचं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं. ते म्हणाले –

***आज जो आपल्याला टोल फ्री नंबर सांगितलेला आहे, हा टोल फ्री नंबर याकरता आहे, की आपल्यापैकी कोणालाही कुठेही अशा प्रकारची शंका आढळली, तर आपण त्यानंबरवर सांगितलं पाहिजे. आपली आयडेंटीटी कुठेही डिस्क्लोज होणार नाही. हे खरंय की आपण, स्वतः कदाचित ड्रग पेडलरशी लढू शकणार नाही. पण त्या लढाईमध्ये आपण एक सैनिकाचं काम करू शकतो. इन्फॉर्मरचं काम करू शकतो. ती एक अत्यंत मोठी समाजाची सेवा असेल. आजच्या काळामध्ये ड्रग ॲडिक्शनच्या विरूद्ध लढणं ही खऱ्या अर्थानं देशभक्ती आहे.***

या कार्यक्रमाला वनमंत्री गणेश नाईक, सिने अभिनेता आणि या उपक्रमाचा दूत जॉन अब्राहम, नवी मुंबई पोलीसचे आयुक्त मिलिंद भारंबे, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. तरुणांनी व्यसनाधीनतेपासून दूर राहण्याचं आवाहन करतांनाच, नशेच्या आग्रहाला निर्धाराने नाही म्हणायचा सल्ला मुख्यमंत्र्यांनी दिला. ते म्हणाले –

***एक ॲडिक्ट हा स्वतःच जीवन तर बरबद करतोच, पण त्याच्या संपूर्ण कुटुंबाचं जीवन बरबाद करतो. अ बंच ऑफ ॲडिक्ट हे समाजाचं जीवन बरबाद करतात. हे आपल्या राज्याचं आणि देशाचं जीवन बरबाद करतात. आणि म्हणून कुठेतरी आपल्याला अशा गोष्टींना नाही म्हणताच आलं पाहिजे. हा मागासलेलाय, बुरसटलेलाय अशा प्रकार हीनवू शकतात. पण त्यावेळी आपण नाही म्हणणं हीच आपल्या जीवनातल्या यशाची गुरुकिल्ली आहे.***

****

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यासंदर्भातला शासन आदेश केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांनी, राज्याचे मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांच्याकडे आज सुपूर्द केला. सामंत यांनी नवी दिल्लीत आज शेखावत यांची भेट घेतली, ज्येष्ठ विचारवंत सदानंद मोरे, आणि राज्य सरकारनं नियुक्त केलेल्या समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर मुळे यावेळी उपस्थित होते. या बैठकीनंतर सदर शासननिर्णय शेखावत यांनी सामंत यांच्याकडे सुपूर्द केला.

सामंत यांनी पत्रकारांना याबाबत माहिती देतांना, प्राकृत भाषेतल्या संशोधनासाठी सहाय्याची विनंती केंद्राकडे केली असल्याचं सांगितलं. ते म्हणाले –

*मराठी भाषेला अभिजात भाषेचा जो दर्जा दिलेला आहे, त्याची अधिसूचना आमच्याकडे म्हणजे महराष्ट्राच्या जनतेकडे सुपूर्द केलेली आहे. मी माननीय नरेंद्र मोदी साहेबांना, आणि सांस्कृतिक मंत्री शेखावत साहेबांना मनापासून धन्यवाद देतो. आमच्या महाराष्ट्राच्या जनतेचं आणि विशेषतः मराठी भाषिकांचं जे स्वप्न होतं, ते आज अधिकृतरित्या परिपूर्ण होतंय. प्राकृत भाषेला जो, अभिजात भाषेचा दर्जा मिळालेला आहे, त्या प्राकृतवर महाराष्ट्रामध्ये देखील फार मोठ्या पद्धतीनं संशोधन होतंय. त्यासाठी देखील निधीची उपलब्धता करून द्यावी अशी मागणी आम्ही शेखावत साहेबांकडे केल्यानंतर त्यालादेखील त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिलाय.*

दरम्यान, महाराष्ट्रासह इतर राज्यात तसंच विदेशातही मराठी भाषेचं जतन संवर्धन करण्यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याची माहिती ज्ञानेश्वर मुळे यांनी दिली. ते म्हणाले –

*आंतरराष्ट्रीय पातळीवर आपल्या महाराष्ट्र शासनाने माननीय एकनाथजी शिंदे मुख्यमंत्री असताना आंतरराष्ट्रीय मराठी मंच स्थापन केलेला आहे. तोही अधिक सक्रीय करण्याची प्रक्रिया यानिमित्तानं सुरू होऊ शकेल असं मला वाटतं. सतरा देशांमध्ये आपले प्रतिनिधी आहेत. ते अजून वाढवून कसं त्यांना या संपूर्ण प्रक्रियेमध्ये सामावून घेता येईल, याचाही विचार मंत्रीमहोदयांच्या मार्गदर्शनाखाली पुढे नेता येईल.*

****

देशभरात वाहन चालक प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यासंदर्भात केंद्रीय रस्ते वाहतुक आणि राजमार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी एक योजना जाहीर केली आहे. अशी प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यासाठी सरकारकडून प्रोत्साहनपर आर्थिक मदत केली जाणार आहे. देशात प्रशिक्षित वाहन चालकांची संख्या कमी असल्याने, अधिकाधिक चालक प्रशिक्षण केंद्र उभारण्यावर सरकारचा भर असेल, असंही गडकरी यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, अपघातातल्या जखमींवर उपचारासाठीच्या कॅशलेस योजनेला केंद्र सरकारनं आजपासून सुरुवात केली. गडकरी यांनी याबाबत अधिक माहिती दिली, ते म्हणाले –

***ॲक्सिडेंट होने के बाद तुरंत चौबीस घंटे के अंदर जैसे ही पुलिस मे इन्फर्मेशन जायेंगी, वो डॉक्टर जो होगा उसको, वो जो पेशंट ॲडमिट होगा, उसको सात दिन तक ट्रीटमेंट का खर्चा या मॅगझिमम देड लाख रूपये हम तुरंत देंगे उसकी ट्रीटमेंट के लिये। बादमें हीट ॲन्ड रन व्हिक्टीम जो है, उसमें भी मृत्यू होती है, तो हम दो लाख रूपये देंगे।***

****

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या सात कलमी कृती कार्यक्रमाची छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात प्रत्येक शासकीय कार्यालयाने अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले आहेत. ते आज विविध विभागांच्या आढावा बैठकीत बोलत होते. जिल्ह्यात वाळूची अनधिकृत वाहतुक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करुन संबंधितांवर गुन्हे दाखल करावे, तसंच महिलांची कामाच्या ठिकाणी, कुटुंबात आणि सार्वजनिक ठिकाणच्या सुरक्षेबाबत सर्व्हेक्षण करून उपाययोजना राबवण्याचे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी संबंधित विभागांना दिले आहेत.

****

गुजरातमध्ये अंकलेश्वर परिसरात कार आणि ट्रकच्या अपघातात पालघरच्या तीन तरुणांचा मृत्यू झाला, तर चार जण गंभीर जखमी झाले. पालघर तालुक्यातले हे तरुण राजस्थानात अजमेर शरीफ दर्गा इथं दर्शनासाठी गेले होते. अजमेरहून पालघरकडे परतत असताना आज सकाळी हा अपघात झाल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

भारताच्या एच. एस. प्रणॉयने मलेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष एकेरीच्या उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. उपांत्यफेरीत त्याची लढत चीनच्या फेंग लीसोबत होणार आहे. मिश्र दुहेरीत भारताच्या ध्रुव कपिला आणि तनिषा कस्ट्रो तसंच आद्या वरियथ आणि सतीश करुणाकरन या जोड्यांनी उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

महिला एकेरीत मालविका बनसोड हिने स्पर्धेची दुसरी फेरी गाठली, ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद यांनीही महिला दुहेरीच्या अंतिम सोळामध्ये प्रवेश मिळवला आहे. मात्र, लक्ष्य सेनचं या स्पर्धेतलं आव्हान संपुष्टात आलं आहे.

****

औद्योगिक तसंच व्यावसायिक कामगारांची २८ वी आणि महिलांची २३ वी खुली राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा येत्या ४ ते ७ फेब्रुवारी दरम्यान मुंबईत आयोजित करण्यात आली आहे. पुरुष शहरी, पुरुष ग्रामीण आणि महिला अशा तीन गटात या स्पर्धेचे सामने खेळवले जाणार आहेत.

****

सुमारे १० लाख रुपयांचं बक्षीस असलेल्या दोन महिला नक्षलवाद्यांनी आज गडचिरोली इथं आत्मसमर्पण केलं. शामला उर्फ लीला झुरु पुडो आणि काजल उर्फ तिम्मी मंगरु वड्डे अशी या दोघींची नावं आहेत.

****

तुळजाभवानी देवीच्या शाकंभरी नवरात्र महोत्सवात आज देवीची विशेष रथ अलंकार महापूजा करण्यात आली. यासंदर्भातल्या आख्यायिकेनुसार भगवान सूर्यनारायणांनी त्रिलोक भ्रमणासाठी देवीला आपला रथ दिला. त्या प्रसंगाची आठवण म्हणून रथ अलंकार महापूजा मांडली जाते.

****

एचएमपीव्ही या श्वसनविकाराबाबत घाबरण्याचं कारण नाही. याचा सामना करण्यासाठी बीड जिल्हा आरोग्य विभाग तयार असल्याचं, बीडचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अशोक थोरात यांनी म्हटलं आहे. धाराशिव जिल्ह्यातही याबाबत आवश्यक दक्षता घेण्यात येत असल्याचं, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष तसंच जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. एस.एल हरिदास यांनी सांगितलं आहे.

****

आमदार सुरेश धस यांनी दिव्यांगांच्या बाबतीत केलेल्या कथित अवमानकारक वक्तव्याबाबत मुख्यमंत्र्यांनी कारवाई करावी, अशी मागणी राज्य दिव्यांग कर्मचारी संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष अशोक आठवले यांनी केली आहे. ते आज बीड इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. या प्रकरणी कारवाई न झाल्यास, मुंबईत मुख्यमंत्र्यांच्या शासकीय निवासस्थाना समोर लोकशाही मार्गाने आंदोलनाचा इशारा आठवले यांनी दिला. परभणी इथं सर्व पक्षीय मोर्चानंतर झालेल्या जाहीर सभेत धस यांनी हे वक्तव्य केल्याचा आरोप केला जात आहे.

****

परभणी इथं वातुक सुरक्षा सप्तानिमित्त शालेय विद्यार्थ्यांनी आज जनजागृती फेरी काढली. हातात वाहतुक सुरक्षेचे संदेश देणारे फलक हाती घेतलेले विद्यार्थी या फेरीत सहभागी झाले.

****

बीड इथले पोलीस शिपाई अनंत मारोती इंगळे यांनी, राहत्या घराजवळ झाडाला गळफास लावून आत्महत्या केल्याचं निदर्शनास आलं आहे, आत्महत्येचं कारण अद्याप समजू शकलेलं नाही.

****